**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे**
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary.state board@gmail.com

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 I EPABX -25705000 I Secretary(P) : 25651750

महत्वाचे/तातडीचे

क्र.रा.मं./परीक्षा-३/५७७०
दिनांक - १६/११/२०१९

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय- फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत....**

**संदर्भः- १)क्र.रा.मं./परीक्षा--३/४९४७ दिनांक ३०/०९/२०१९ चे पत्र.**
**२)क्र.रा.मं./परीक्षा--३/५३२१ दिनांक २२/१०/२०१९ चे पत्र.**

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने दि. ०३/१०/२०१९ ते १५/११/२०१९ तसेच व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे नियमित शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने दि. ०३/१०/२०१९ ते १५/११/२०१९ या कालावधीत व विलंब शुल्कासह दि. १६/११/२०१९ ते २५/११/२०१९ या कालावधीत भरावयाची होती. परंतु आवेदनपत्रे भरताना उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना तांत्रिक व इतर अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सबब सदर आवेदनपत्रे भरण्यास मुदतवाढ देण्यात येत असून सदर मुदतवाढीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन आणि व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) व सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ) नियमित शुल्कासह → | गुरुवार दि. ०३/१०/२०१९ ते सोमवार दि. २५/११/२०१९ | शुक्रवार दि. ०१/११/२०१९ ते शुक्रवार दि. ०६/१२/२०१९ |
| ब) विलंब शुल्कासह → | मंगळवार दि. २६/११/२०१९ ते गुरुवार दि. ०५/१२/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

अ) उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे (वितरण केंद्र) शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व **Pre-list** जमा करावयाची तारीख = सोमवार दि. ०९/१२/२०१९

1772

ब) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी **Pre-list Print** करुन विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर **Pre-list** चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. **विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या link वरुन आवेदनपत्रे भरावयाची आहेत.**
२. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.
३. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.
४. आवेदनपत्रांसोबत नियमित/विलंब शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचा निकाल जाहीर केला जाणार नाही ही बाब सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

---

क्र.कोविमं/उच्च माध्य परिक्षा/
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक : १८ नोव्हेंबर, २०१९

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

वरीलप्रमाणे उच्च माध्यमिक (इ.१२वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु-मार्च 2020 परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर
विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६००४

■ जिल्हा वितरण केंद्रासाठी सूचना :

अ) वरीलप्रमाणे दि. ०९/१२/२०१९ रोजी कनिष्ठ महाविद्यालयांकडून केंद्रावर जमा होणारे साहित्य (उदा. विद्यार्थी याद्या, शुल्क चलन व Pre.list इ.) या कार्यालयाकडे दि. ११/१२/२०१९ रोजी जमा करावयाचे आहे.

ब) दि. २८/११/२०१९ रोजी फेब्रु.२०१९ ची प्रमाणपत्रे वाटप व परीक्षक / नियामक स्वीकृती पत्रे स्वीकारली जाणार आहेत.